# स्त्री

स्त्री - विधात्याने निर्माण केलेली अद्भुत कलाकृती ।
जिचे मन नवनीत आहे, पण छाती पोलादी आहे ॥
ती कधीच पराभूत होत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - - ॥धृ॥

ती मुलगी असते, ती माता असते ।
ती सखी असते, ती भार्या असते ॥
ती सर्व नात्यांशी समरस होते,
कुणापासून कधीही तुटत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - ॥१॥

ती दोष झाकून नेते, सर्वांची मनं सांभाळून ।
ती प्रेमात बांधून ठेवते, सारे भेदभाव विसरुन ॥
तिच्या नजरेतून कधीच काही सुटत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - ॥२॥

मना मनातील अंतर कमी करते, मायेने कुरवाळून ।
सर्वांना जोडून ठेवते, आधाराचा बांध घालून ॥
तिची माया कधीच आटत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - ॥३॥

ती अलवार मलम लावते, स्वत: घाव सोसून ।
हळूवार फुंकर घालते, मनातील दाह विसरुन ॥
तिच्याकडून कधीच काही विस्कटत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - - ॥४॥

ती दुसऱ्यांना जीवन देते, स्वत: जाते विरघळून ।
इमारत उभी करते, स्वत: पायातील दगड बनून ॥
तिच्याकडून कधीच काही कोसळत नाही,
कारण ती जीवाच्या आकांताने लढते,
आशेच्या शेवटच्या टोकापर्यंत - - - - - - - ॥५॥

सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर, कोथरुड पुणे
9405438939